## समारोप

मी व्यावसायिक रंगभूमीवर जे काम केले त्याबद्दल मी समाधानी, कृतज्ञ आहे. मला हा नाट्यव्यवसाय वाईट आहे असे चुकूनही कधी वाटलं नाही. तुम्ही चांगले आहात असे तुम्हाला अंतःकरणपूर्वक वाटत असेल तर, तुम्हाला चांगली माणसेच भेटतात यावर माझा ठाम विश्वास आहे. शेवटी कुठलाही व्यवसाय, प्रामाणिकपणानं केलेला वाईट नसतोच. दोष कुठल्या व्यवसायात नसतात?

माझ्या आयुष्यात आलेल्या, मला मदत केलेल्या, मार्गदर्शन केलेल्या असंख्य व्यक्ती आहेत. त्यांचे माझ्यावर डोंगराएवढे ऋण आहेत.

आज मला आठवण येते ती माझ्या आईची, आजीची आणि गार्डियन शीला शुक्ल यांची ! तसेच मला अमाप कृतज्ञता वाटते ती कुमुद मेहतांची आणि श्री.मेहतांची ज्यांनी माझ्यावर मुलीसारखी माया केली. मेहतांचे स्नेही सत्येंद्रभाई त्रिवेदीमुळे माझा बेगम अख्तरांशी परिचय झाला. बेगम अख्तरांचा सहवास मला सहा वर्षे सतत लाभला. तसेच कुमुद मेहतांमुळे, पु.ल., गिरीश कर्नाड, हृदयनाथ मंगेशकर, दुर्गा भागवत या अनन्यसाधारण, प्रतिभावान व्यक्तींशी माझा परिचय झाला. त्यांचे मला मार्गदर्शन लाभले. त्यामुळे मी अंतर्यामी समृद्ध झाले, परिपक्व झाले.

या माझ्या नाट्य वाटचालीत अनेक नाट्यसंस्था, दिग्दर्शक, कलाकार मला लाभले. ज्यांच्याकडून मी थोडंबहुत शिकू शकले. या सगळ्यांमुळे माझे आयुष्य उजळून गेले आहे असे मला वाटते.

शेवटी एकच म्हणावेसे वाटते...

हम अकेले ही चले थे जानिबे मंज़िल मगर
लोक साथ आते गये और काँरवा बनता गया !

आज बेळगावात मला जो सन्मान मिळतो आहे, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. जणूकाही माझ्या ५० वर्षांच्या नाट्यकारकीर्दीला तुम्हा रसिकांची पोचपावती मिळते आहे असे मला वाटते. मला बेळगाव आवडते आणि बेळगावी लोकही आवडतात. तुमच्या या प्रेमाला, सत्काराला मी कुर्निसात करते.

तसेच माझ्यावर अपरंपार प्रेम करणाऱ्या सर्व रसिकांचे, चाहत्यांचे, श्रोत्यांचे, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे,